VOL. 4 | ISSUE 2 | FEB. 2018
(UGC Approved Journal No. 63716)

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197 (IIJIF)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL


## SPECIAL ISSUE

On the Occasion of One Day International Conference On

# RECENT ADVANCES IN LANGUAGES, LITERATURE AND SOCIAL SCIENCES

17th February, 2018

(BOOK- 1)



*Guest Editors*

**Prof. G. N. Sonwane**

**Dr. Shirish Kadu**

ORGANIZED BY
MGEWS
CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN, DIST. THANE &
NEW MAN INTERNATIONAL JOURNAL OF MULTI-DISCIPLINARY STUDIES, PARBHANI
www.newmanpublication.com

Scanned by CamScanner

**Full Journal Title:** Chronicle of Humanities & Cultural Studies(CHCS)
**Print ISSN:** 2454-5503
**UGC Approved Journal No. 63716**
**Impact Factor:** 4.197 (IIJIF)
**Frequency:** Bimonthly / **Language:** Multi language / **Journal Country/Territory:** India
**Publisher:** Centre for Humanities & cultural Studies, A-102, Sanghavi Regency, Sahyadrinagar, Kalyan (W) (MS).
**Subject Categories:** Humanities & Cultural Studies

*Issue Editors: G.N.Sonwane & Dr. Shirish Kadu*

*Chief Editor*
**Dr Kalyan Gangarde**
Director, Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)
*Executive Editor*
**Dr Grishma Khobragade,** Asst. Prof., Birla College, Kalyan (W)
*Co- editors*
**Dr. Sadhana Agrawal,** Asst. Professor, Maharani Laxmibai Govt. College of Excellence, Gwalior (M.P.) India
**Pandurang Barkale,** Asst. Professor, Dept of English, SNDT Women's University, Churchgate, Mumbai
**Bharat Gugane,** Asst. Professor, Bhosala Military College, Nashik, Maharashtra
**Dashrath Kamble,** Asst. Professor, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra
**Sachin Bhumbe,** Asst. Professor, P. N. Doshi College, Ghatkopar, Mumbai

## EDITORIAL ADVISORY BOARD

**Aju Mukhopadhyay,**
a poet, author and critic, 8 Cheir Lodi Street, Pondicherry, India.
Email: ajum24@gmail.com
**Dr R.T. Bedre,**
Principal RSPMS' SPP College, Sirsala, Dist. Beed (MS)
**Dr (Mrs.) Smita R. Nagori,**
Head,PG Department of English, M.U.College Udgir, Dist. Latur, Maharashtra, India. Email: smita.lakhotiya@gmail.com
**Dr Arvind Nawale**
Head, Department of English, Shivaji Mahavidyalaya Udgir, Dist. Latur (Member, BoS in English, Former Member of the Senate, Faculty of Arts, SRTM University, Nanded amnawale@gmail.com

**Dr Kailash Nimbalkar,**
Principal, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra, India. Email: nimbalkar_8@rediffmail.com.
**Tsai-ching Yeh**
Assistant professor, Department of English, National Taipei University of Technology. (Taivan)
**Dr B. N. Gaikwad,**
Vice Principal, N.G. Acharya and D.K. Marathe College of Arts, Commerce and Science , Chembur (East), Mumbai-400071
**Dr Simon Philip,**
Assistant professor, Department of Social Work, Voorhees College, Vellore
**Dr Binu Anitha Josheph**
Assistant professor, Department of English, Voorhees College, Vellore
**Dr Chandrashekhar Kanase**
Head, Department of Dramatics, SPP College, Sirsala, Dist Beed (MS)

## EDITORIAL BOARD

**Dr.Mahendra Shinde,** Associate Professor and Head, Department of English, N.M. Sailu, Dist. Parbhani, Maharashtra, India.
**Ram Bhise,** Assistant Professor, Saraswati College of Engineering, Kharghar, Navi Mumbai Maharashtra,India.
**Dr Asish Gupta,** Asst. Professor, J. H. Govt. P. G. College, Betul MP.

| Subscription Rates | | |
|---|---|---|
| | Annual membership (Individual) | Rs. 1,800 (150 $ for foreigners) ( Six Issues ) |
| | Bi-annual Membership | Rs. 3,500 (250 $ for foreigners) |
| | Institutional annual membership | Rs. 2,200 |
| | Institutional Bi-annual membership | Rs. 4,200 |

*Those interested in making online transactions, the following details may be of use:*

| Bank Name | Account Name | Account Number | IFSC code |
|---|---|---|---|
| Canara Bank **(Branch: New Marine Lines, Mumbai)** | Centre for Humanities & Cultural Studies | 1389101071921 | CNRB0001389 |

*DISCLAIMER: Academic facts, views and opinions published by authors in the Journal express solely the opinions of the respective authors. Authors are responsible for their content, citation of sources and the accuracy of their references and biographies/references. The editorial board or Editor in chief cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights.*



Scanned by CamScanner

## CONTENTS


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | मानवी हस्तक्षेप, जागतिक तापमान वाढ आणि परिणाम | प्रा.बालाजी आर. गुरुडे<br>प्रा. डॉ. प्रकाश के. मोरखंडे | 06 |
| 2. | स्वामी विवेकानंदाचा मानवतावादी दृष्टीकोण | प्रा.माणिक एम. कदम | 10 |
| 3. | पाश्चिमात्य विचारांचे निर्माते – सॉक्रेटिस | प्रा.राजेश कांबळे | 12 |
| 4. | "कहार जमातीची" दशा आणि दिशा | पांडव संदीप राजाभाऊ | 14 |
| 5. | पंचायत राज व्यवस्थेतील महिलांचा सहभाग ...... | डॉ.रामराज गावंडे | 17 |
| 6. | जागतिकीकरणाचे परिणाम | डॉ. सुनंदा एकनाथराव आहेर | 19 |
| 7. | बालगृहातील दुर्धर आजारग्रस्त बालकांचा समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून अभ्यास | डॉ. प्रमिला भुजाडे | 22 |
| 8. | आधुनिक काळात ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य : एक वास्तविकता | प्रा.डॉ.अन्सारी एस.जी. | 26 |
| 9. | बालकामगार कायदे.आणि बालकामगारांची स्थिती | डॉ. आहिरे पी. बी<br>प्रा. सिताराम के. मोगल | 28 |
| 10. | हुंडाबळी नैतिक समस्या | डॉ. आंबटकर व्हि. ओ. | 30 |
| 11. | शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेत मुस्लीमांचे योगदान | प्रा.डॉ.अनिल ठाकरे | 33 |
| 12. | मानवाधिकारः मानवी जिवनातील मुलभूत अधिकार | आकाष शेषराव बांगर | 35 |
| 13. | ग्रामीण शिक्षणावर माहिती तंत्रज्ञानाचा झालेला परिणाम | कु. महाजन सविता प्र. | 38 |
| 14. | ग्रथांलयातिल अमुद्रित साहित्याचे व्यवस्थापन | राजकुमार ग.बोंडे | 41 |
| 15. | जागतिकीकरणाचे समाजव्यवस्थेवर होणारे परिणाम | डॉ.सुरेखा वैजनाथराव दाडगे | 46 |
| 16. | भारतातील महिला सबलीकरण व राजकारण | डॉ.ढाले एस.यु. | 48 |
| 17. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संघटनाविषयक विचार | गायकवाड प्रतिमा बाळासाहेब | 51 |
| 18. | कुतुबशाही लढाया व युध्दपध्दती | श्री मदन अशोकराव जाधव | 53 |
| 19. | भारतातील बदलती ग्रामीण समाजव्यवस्था | डॉ. बळीराम प. अवचार | 55 |
| 20. | माहिती आणि समाज संकल्पना | अतुल दत्तु जगताप | 57 |
| 21. | भारत और आसियान | डॉ. अनंत मदन आवटी | 61 |
| 22. | जैन धर्मियांचे महान तीर्थक्षेत्रः फलटण | डॉ.संतोष तुकाराम कदम | 65 |
| 23. | भारतीय संगीत षास्त्रातील एक अश्टपैलू व्यक्तीमत्व डॉ. लक्ष्मीनारायण गर्ग | जयश्री वि. कडू<br>डॉ. शिरीश कडू | 68 |
| 24. | भारतीय अर्थव्यवस्था आणि शेती विकास | डॉ. विजय एच नागरे | 69 |
| 25. | डॉ. साहेब खंदारे यांचे "व्यक्तिगतग्रंथालय" | डॉ. घ.ना.पांचाळ | 72 |
| 26. | निवडणूका आणि मतदार वर्तन | प्रा.डॉ. राहुल पंडित | 74 |
| 27. | 'फास्टफुड सेवनाचा मानवी आरोग्यावर होणारा परिणाम एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. पुंडगे भिमराव दलितराव | 76 |
| 28. | भारत : रोकड विरहीत अर्थव्यवस्था- साधने, सवलती फायदे व दक्षता | डॉ.रोडे दिगंबर भगवानराव | 77 |
| 29. | दहशतवादाचे बदलते स्वरूप | प्रा.भाऊसाहेब सांगळे | 80 |
| 30. | भाषेच्या विकासातील शालेय अभ्यासक्रमाची भूमिका | प्रविण चंद्रकांत इंगोले | 83 |
| 31. | पराक्रमी महार जात | डॉ. प्रकाश संभाजी वाघमारे | 85 |
| 32. | महिला आणि चाळीशीतील आरोग्य | सय्यद आफरोज अहेमद | 89 |
| 33. | नागपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींमध्ये ग्राहक संरक्षणाबद्दल असलेली जागरूकता ... | प्रा. कविता आर. बोरकर | 91 |
| 34. | मध्ययुगीन समतासुर्य – महात्मा बसवेश्वर | प्रा. डॉ. डी. पी. हिंगमिरे | 100 |
| 35. | आधुनिक काळातील ज्येष्ठांच्या समस्या : धोरण व उपाय | कु.शिखा जगदीश शर्मा | 103 |
| 36. | राष्ट्रीय चळवळीत विदर्भाचे योगदान 1885–1920 / | डॉ. उज्वला एस. साळवे | 105 |
| 37. | महिलांचे मानसिक आरोग्य | अश्विनी संतोष बळसाणे | 107 |
| 38. | **इयत्ता सातवीच्या विज्ञान विषयासाठी बहुआयामी पृच्छाधारित अध्ययन पध्दतीचा परिणामकारकतेचा अभ्यास** | **प्राजक्ता मेढेकर**<br>**डॉ. मृदुला रानडे** | 112 |
| 39. | उत्तर भारतीय संगीत के परिप्रेक्ष्य में फ्यूजन संगीत और उसके विविध प्रकार/श्रीमती विजल पटेल | डॉ अनया थत्ते | 118 |




Scanned by CamScanner

**26**

# निवडणूका आणि मतदार वर्तन

प्रा.डॉ. राहुल पंडित
राज्यषास्त्र विभाग प्रमुख
श्री षिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर जि.पुणे मो.नं. 9665623634

**प्रस्तावना:–** भारतीय राज्यघटनेतील तरतूदी प्रमाणे भारतात प्रौढ व गुप्त मतदान पद्धती स्वीकारण्यात आली आहे. त्यानूसार 18 वर्ष पुर्ण करणा–या प्रत्येक स्त्री–पुरुषास मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे. मतदार वर्गानी केलेल्या जबाबदार वर्तनातूनच प्रत्येक लोकषाही व्यवस्थेचे अस्तीत्व टिकुन राहत असते. आपणास मिळालेल्या अमुल्य मतांचा योग्य वापर करुन सदृढ षासनाची निर्मिती करणे व आपला सर्वांगीन विकास साध्य करुन लोकषाहीची मुळे खोलवर रुजविण्यात मदत होत असते. वास्तविक मतदाराच्या अधिकारातून आपण सद्सद्विवेक बुद्धिचा वापर करुन विकासास चालना देणा–या वैचारीकतेवर अधारीत राजकीय पक्षाच्या उमेदवाराची निवड करुन सक्षम षासनाची निर्मिती करणे अपेक्षित आहे. पण भारतात असणारी विविधता मतदार वर्तनावर परीणाम पाडत असतांना दिसते व त्यातून मतदार वर्तनाचा आकृतीबंध तयार होतो. परिणामी मतदार वर्ग संकुचित वृत्तीचा वापर व भूलथापांना बळी पडून, विवेकबुद्धिचा वापर न करता अयोग्य उमेदवाराला निवडूण देण्याचा धोका मोठया प्रमाणात असतो.

**मतदार वर्तनावर प्रभाव पाडणारे घटक:–**

भारतात असणारी विविधता मतदार वर्तनावर परीणाम पाडत असतांना दिसते व त्यातून मतदार वर्तनाचा आकृतीबंध तयार होतो. खालील काही घटकांचा मतदार वर्तनावर पडलेला प्रभाव अभ्यासता येईल.

1. **धार्मिकता:–** भारतीय सामाजिक व्यवस्थेचे वेगळे स्वरुप म्हणजे येथे असणारे विविध धर्माचे अस्तित्व. तुलनात्मक पाहता जगातील कोणत्याही देषापेक्षा भारतात धार्मिकता जास्त प्रमाणात आहे. धर्मावर अधारीत येथिल सामाजिक व्यवस्थेचे चित्रण आहे. सुरवातीपासुनच धार्मिक अस्मिता जोपासण्याचा प्रयत्न झाला आहे. सामाजिक जिवनात धर्माचे महत्व अधिक असल्या कारणाने येथिल नागरीकांच्या एकुणच वर्तनावर तसा परीणाम पडतो. भारतीय राज्यघटनेत आपण जरी धर्मनिरपेक्षता स्वीकारली असली तरी प्रत्यक्ष व्यवहारात मात्र धर्मसापेक्षता आढळून येते. सहाजिकच मतदार वर्तनावर त्याचा विपरीत परीणाम पडतो. काही राजकीय पक्षाची निर्मिती धार्मिकतेच्या मुद्यावर अधारीत झालेली पाहावयास मिळते. निवडणूकांत मतदारावर प्रभाव पाडण्यासाठी काही राजकीय पक्ष धर्माचा वापर करतात. काही धार्मिक संघटना आपल्या धर्माचा प्रभाव व्यवस्थेवर राहण्याकरीता प्रयत्नषिल आहेत. ज्या मतदार संघात ज्या धर्माची लोकसंख्या जास्त आहे त्याच धर्माच्या व्यक्तिला उमेदवारी दिली जाते. व मतदार वर्ग सुद्धा आपल्याच धर्माच्या उमेदवाराला मतदान करतात.

2. **जातीयवाद:–** भारतीय सामाजिक व्यवस्थेचे भेसुर व विकृत चित्रण म्हणजे येथिल समाजाची वेगवेगळया जातीत असणारी विभागणी होय. येथिल जातीय व्यवस्थेचे विदारक चित्र स्पष्ट करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, येथिल सामाजिक व्यवस्थेला लागलेली कीड म्हणजे जात होय. जात या घटकाचा प्रभाव मतदार वर्तनावर खोलवर पडलेला पाहावयास मिळतो. येथिल जातीचे वैषिष्टये म्हणजे प्रत्येक जातीला आपल्यापेक्षा वरच्या जातीचे आकर्षण असते. तर खालच्या जातीपेक्षा आपण कसे श्रेष्ठ आहोत हे दाखविण्याचा प्रयत्न होत असतो. सुरवातीपासूनच येथिल राजकीय व्यवस्थेत जातीचा उपयोग काही राजकीय पक्षांनी सत्तेत येण्यासाठी केला आहे. जषी धार्मिकतेच्या मुद्याला अनुसरुन काही राजकीय पक्षाची निर्मिती झाली आहे तषीच काही राजकीय पक्षाची निर्मिती जातीच्या मुद्यावर अधारीत झालेली पाहावयास मिळते. निवडणूकांत मतदारावर प्रभाव पाडण्यासाठी काही राजकीय पक्ष जातीचा वापर करतात. काही जातीय संघटना आपल्या जातीचा प्रभाव व्यवस्थेवर राहण्याकरीता प्रयत्नषिल आहेत. ज्या मतदार संघात ज्या जातीची लोकसंख्या जास्त आहे त्याच जातीच्या व्यक्तिला उमेदवारी दिली जाते. व मतदार वर्ग सुद्धा आपल्याच जातीच्या उमेदवाराला मतदान करतात. प्रसंगी काही राजकीय पक्ष सत्तेत येण्यासाठी जातीय दंगली घडवून आणतात.

3. **दिव्यवलंयकीत नेतृत्व:–** मतदार वर्तनावर प्रभाव पाडणारा एक महत्वपुर्ण घटक म्हणजे दिव्यवलंयकीत नेतृत्व होय. ज्या नेतृत्वाकडे असामान्य गुण असतात त्याचा प्रभाव मतदार वर्गावर पडत असतो. भारतात सुरवातीपासून पाहिले तर पंडित नेहरु, इंदिरा गांधी, जयप्रकाष नारायण, राजीव गांधी, व्हि.पी. सींग, अटलबिहारी वाजपेयी व नरेंद्र मोदी यांच्या कडे असणा–या असाधारण गुणांमुळेच मतदार वर्गावर प्रभाव पडलेला दिसतो. व त्या–त्या काळात सत्ता मिळविण्यात यष संपादन केले आहे.

4. **भाषा:–** भाषा या घटकाचा सुद्धा मतदार वर्तनावर प्रभाव पडतांना दिसतो. भारतात अनेक भाषा बोलल्या जातात. भारत स्वतंत्र झाल्यावर राज्यांची पुनर्रचना करतांना भाषावार प्रांत रचना करण्यात आली आहे. आपल्या भाषेस प्राप्त होणारा दर्जा तसेच भाषेच्या



Scanned by CamScanner

बाबतीत निर्माण होणा–या समस्येच्या बाबतीत लोक भावनिक जोडलेले असतात. या प्रश्नावर लोक सहाजिकच एकत्र येत असतात. काही राजकीय पक्षाचा उदयच भाषा या घटकावर अधारीत झाला आहे. भाषिक अस्मिता निर्माण करुन ते मतदारांना प्रभावित करतात व सत्ता प्राप्ती करतांना दिसत आहेत.

5. **प्रांतवादः–**भारतातील मतदारावर प्रांतवादाचा प्रभाव आढळून येतो. 1989 पासून भारतात आघाडयाचे षासन ही संकल्पना वाढीस लागण्याचे कारण म्हणजे प्रांतवादावर आधारीत प्रादेषिक पक्षांचा झालेला उदय होय. प्रादेषिक पक्ष हे स्थानिक प्रष्नांना महत्त्व देण्यातून राजकारण करतात. स्थानिक प्रष्नांवरुन मतदार वर्ग अधिक भावनिक होवून राष्ट्रिय हितापेक्षा स्थानिक प्रष्नांना महत्व देतात.

6. **राजकीय पक्षांची विचारसरणीः–**प्रत्येक राजकीय पक्ष विषिष्ट प्रकारची विचारसरणी धारण करुन सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करीत असतात. प्रत्येक निवडणूकीत पक्षाने स्वीकारलेल्या विचारसरणीवर आधारीत आपल्या पक्षाचा निवडणूक अजेंडा तयार करत असतात. त्यातून मतदारांना त्यांना विविध प्रकारच्या सोयी पुरविण्याचे अष्वासन देत असतात. मतदार वर्ग उमेदवाराची पात्रता न तपासता तो आपल्या विचाराषी मिळती विचारसरणी असणा–या पक्षामार्फत उभा आहे या कडे पाहुन मतदान करतात.

7. **पैषाचा वापरः–**भारतात निवडणूका हया अधिक महागडया होत चालल्या आहेत. अर्थात निवडणूकांवर मोठयाप्रमाणात पैसा खर्च होतांना दिसत आहे. निवडणूका व पैसा हे समीकरण बनत चालले आहे. सर्वच प्रकारच्या निवडणूकांत उमेदवार हे मतदारांना पैसे वाटतात. पुर्वि उमेदवार हे मतदारांना आर्थिक प्रलोभणे देवून त्यांची मते खरेदी करीत असत आता विपरीत स्थिती बघावयास मिळते, म्हणजे मतदार हे उमेदवारांना आपली मते विकु लागली आहेत. पैसे घेवून मतदान करण्याची प्रवृती बळावत चालली आहे. मतदान करतांना कोणता उमेदवार जास्त पैसे देतो यावर मतदान केले जाते. प्रसंगी मताचा भाव ठरला जातो अपेक्षित रक्कम जर नाही मिळाली तर काही मतदार मतदान करण्याचे टाळतात. एकुणच निवडणूकात पैषाचा वापर होत असल्या कारणाने त्याचा मतदार वर्तनावर परीणाम पडतो.

8. **मतदारांचे हितसंबंधः–**मतदार वर्ग आपल्या आषा, अपेक्षा व हितसंबंध याची जोपासना करतांना आपल्या वर्तनात बदल करीत असतात. प्रत्येक मतदार आपल्या हितसंबंधाचे संवर्धन षासनामार्फत झाले पाहिजे याचा विचार करीत असतात. समाजातील प्रत्येक मतदारांची सामाजिक व आर्थिक पार्ष्वभूमी समान नसल्याकारणाने त्यांचे हितसंबंध वेगवेगळे असतात. व आपल्या हितसंबंधाना अनूसरुन वेगवेगळया राजकीय पक्षांना मतदान करतात. त्यामध्ये विविधता आढळून येते.

9. **निरक्षरताः–**भारतात ग्रामीण व आदीवासी बहुल भागात निरक्षरतेचे प्रमाण जास्त पहावयास मिळते. ते पारंपारीक जिवन जगत असतात. निरक्षर मतदाराला आपण कोणत्या उमेदवाराला मतदान करावे याचा स्व निर्णय घेता येत नाही. मुळात त्यांच्या राजकीय जाणिवांचा विकासच झालेला नसतो. त्यांना आपल्या वरीष्ठ व्यक्तिच्या सल्यावर आवलंबून राहावे लागते.

वरील काही महत्वाच्या मुद्याबरोबरच उपराष्ट्रवाद, उमेदवारांचे वय व लिंग, सत्ताधारी पक्षाचे धोरणे, अनामिकता, उमेदवारांची सार्वजनिक प्रतिष्ठा, चालु घडामोडी, निवडणूक प्रचार, स्थानिक मुद्दे या घटकांचाही प्रभाव मतदार वर्तनावर पडत असतो.

**निष्कर्षः–** भारतासारख्या मोठया लोकषाही व्यवस्थेत सातत्याने कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या निवडणूका पार पडत असतांना दिसतात. लोकषाहीमध्ये लोकांचा सक्रिय सहभाग अपेक्षित असतो. लोकांचे तसे सामाजिकरण होणेही अपेक्षित आहे. मतदार वर्तनावर वरील नमुद केल्याप्रमाणे विविध घटकांचा प्रभाव पडत असतो. बदललेल्या काळखंडाला व परिस्थितीतीला अनूसरुन मतदार वर्गात जाणिव जागृती होतांना दिसत आहे. एका सक्षम षासनाची निर्मिती व त्यातून सक्षम भारताची निर्मिती ही संकल्पना मतदार वर्गाच्या जबाबदार व वैचरीक भूमिकेवर अधारीत आहे.

**संदर्भः–**


1. कारेकर मंजिरी आणि सुवर्णा बेनके, भारताचे षासन आणि राजकारण, पिअर्सन एज्युकेषन, दिल्ली–2014
2. जाधव तुकाराम आणि महेष षिरपुरकर, भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया, द युनिक अकॅडमी, पुणे –2011
3. भोळे भा.ल., भारतीय गणराज्याचे षासन आणि राजकारण ,पिंपळापुरे अॅन्ड कंपनी पब्लिषर्स , नागपूर–2003
4. प्रा. वी.बी. पाटील, भारतीय षासन आणि राजकारण, फडके प्रकाषन, कोल्हापूर
5. भारतीय षासन आणि राजकारण, प्रा. डॉ. षरद घोडके, प्रा. डॉ. जे. सोनखासकर, प्रा. डॉ. डी.सी वाबळे, प्रा. प्रकाष पवार, सक्सेस पब्लिकेषन , पुणे


❑❑❑



Scanned by CamScanner